# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी.,पीएच् डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/१६६/२०१४ दि. २४ सप्टेंबर २०१४

प्रति
मा.प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय :— किटकजन्य आजार संदर्भात जनतेमध्ये जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत...

महोदय,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी कळविल्यानुसार यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेने किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने हे वर्ष किटकजन्य आजाराला प्रतिरोध वर्ष म्हणून साजरा करावयाचे ठरविले आहे.

उपरोक्त विषयास अनुसरून या वर्षी जागतिक आरोग्य संघटनेने किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने हे वर्ष किटकजन्य आजाराला प्रतिरोध वर्ष म्हणून साजरा करावयाचे ठरविलेले आहे.

राज्यामध्ये सध्या किटकजन्य आजारासाठी पारेषण काळ सुरू असून किटकजन्य आजारांच्या रूग्णांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून या आजारांना अत्यंत चांगल्या प्रकारे प्रतिबंध करता येईल अशी धारणा आहे. त्यासाठी आपणांकडून या कार्यक्रमासाठी खालील बाबींसाठी आवश्यक ते सहकार्य अपेक्षित आहे.

१. आपले राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आपण दरवर्षी खेडयामध्ये आयोजित करता व तेथे आपण विविध स्वच्छतेच्या मोहिम राबवित असता त्याच अनुषंगाने आपल्या जिल्हयामध्ये अथवा कार्यक्षेत्रामध्ये गावांची निवड करतांना ज्या गावांमध्ये किटकजन्य आजारांचे उद्रेक झालेले आहेत त्या गावांची निवड करावी यासाठीचे आवश्यक सहकार्य आपल्या जिल्हयाचे जिल्हा हिवताप अधिकारी करतील.

P.T.O.

२. या गावामध्ये सर्व पाणीसाठयांचे निरीक्षण करून डासांच्या अळया असलेली भांडी रिकामी करावीत याबाबत आवश्यक असणारे तांत्रिक मार्गदर्शन आपणाला देणेत येईल.

३. गावामध्ये आठवडयातून एकदा सर्व पाण्याची भांडी घासून पुसून स्वच्छ करणे व ती झाकून ठेवणेसाठी आवश्यक ती जनजागृती त्या गावामध्ये करणे. (कोरडा दिवस पाळणे.)

४. आपणांकडे दररोज संध्याकाळी विविध वक्त्यांना प्रबोधन करणेसाठी बोलविले जाते त्यामध्ये या आरोग्य विभागाच्या तज्ञांचाही समावेश करणेत यावा जेणेकरून आपल्या मुलांना व जनतेला या आजारांसाठी प्रतिबंध करणेसाठी मार्गदर्शन प्राप्त होईल.

५. सध्या पावसाळा सुरू आहे त्यामुळे ठिकठिकाणी पाणी साचून डासोत्पत्ती स्थाने तयार होत आहेत तसेच या काळामध्ये किटकजन्य आजारांचे प्रमाण वाढत असल्याने या कालावधीमध्ये आपल्या रा. से.यो. स्वयंसेवकांमार्फत संवेदनशील गावांमध्ये पाणी साठे तपासणी ते रिकामे करणे इ. कार्यवाही करणेसाठी सहकार्य अपेक्षित आहे. यासाठी या मुलांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था प्रत्येक जिल्हयांच्या, तालुक्याच्या ठिकाणी राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम सह संचालक आरोग्यसेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग पुणे – ६ या कार्यालयामार्फत करणेत येईल.

तरी वरीलप्रमाणे उपक्रम राबवित असतांना खालील कार्यालयांशी संपर्क साधावा

१. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे, ........ (सर्व)
२. सहायक संचालक, आरोग्य सेवा, (हिवताप) ........ (सर्व)
३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,. ....... (सर्व)
४. जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हे/महानगरपालिका ..... (सर्व)
५. जीवशास्त्रज्ञ, नागरी हिवताप योजना, महानगरपालिका ..... (सर्व)

याबाबतच्या तांत्रिक तसेच आवश्यक मार्गदर्शन जिल्हा हिवताप अधिकारी आपणाला करतील तरी याबाबत आपणाकडून उचीत कार्यवाही व्हावी ही नम्र विनंती.

<u>अधिक माहितीकरीता</u> :

| राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, सह संचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर, येरवडा, पुणे – ४११००६ | |
|---|---|
| दूरध्वनी क्रमांक कार्यालय — | २६६८३९२२ |
| राज्य आरोग्य सोसायटी — | २६६८३५५० |
| सह संचालक (वैयक्तिक) — | २६६८४८९३ |
| प्रकल्प संचालक (वैयक्तिक) — | २६६८३६८८ |
| सहा. संचालक (ह) (वैयक्तिक) — | २६६८५४६८ |
| राज्य किटकशास्त्रज्ञ (वैयक्तिक) — | २६६८५७८७ |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी (वैयक्तिक) — | २६६१२१७८ |

कळावे.

आपला विश्वासू

**प्र. कार्यक्रम समन्वयक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**